- प्रेस नोट -

दि. २६/१०/२०२६

भांडुप पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

फिर्यादी श्री. आप्पासो संभाजी हजारे, वय-३७ वर्षे, धंदा नोकरी (पो.ह.क्र. ०८०७१९), भांडुप पो ठाणे नेमणुक, रा.ठी. मुलुंड पश्चिम, मुंबई यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. २५/१०/२०२६ रोजी ०२.३० वा. सुमारास मद्रास कॅफे, साउथ बॉन्ड, भांडुप पश्चिम, मुंबई येथे अटक आरोपी पुरूष वय-२७ वर्षे, याने त्याच्या ताब्यातील काळया रंगाची बजाज प्लसर NS मोटार सायकल जाणीव पुर्वक व हेतुपरस्पर भरधाव वेगाने विनापरवाना चालवुन फिर्यादी, फिर्यादीच्या इतर सहकारी अंमलदार व अधिकारी हे आपले रितसर कायदेशीर कर्तव्य पार पाडत असताना फिर्यादी यांच्या अंगावर घालुन त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांच्या कायदेशिर कर्तव्यात अडथळा निर्माण केला तसेच सार्वजनिक ठिकाणी रस्तावर स्वत:च्या व इतरांच्या जीवीतास धोका होईल असे हयगयीचे कृत्य करीत असताना आढळुन आला व सदर वेळी आरोपी हा मद्यप्राशन केलेल्या स्थितीत असल्याचे निष्पन्न झाले. म्हणून फिर्यादी यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन दि. २५/१०/२०२६ रोजी गु.र.क्र.१०५१/२६, कलम १०९(१), २२१, २८१, १२५ बीएनएस २०२३ सह १८१, १८५, ३ मोटार वाहन अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
